**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री स्वनिधी योजनेच्या १ लाख लाभार्थ्यांना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते कर्ज वितरण
- शरद पवार यांचं नाव आणि फोटो न वापरण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे अजित पवार यांच्या पक्षाला आदेश
- इंडिया आघाडीची सत्ता आल्यानंतर शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याचं काँग्रेस नेते राहुल गांधी यांचं आश्वासन

**आणि**

- विदर्भाला नमवून मुंबईनं पटकावलं बेचाळीसावं रणजी करंडक विजेतेपद / तनुष कोटियन ठरला मालिकावीर

**<><><><><>**

प्रधानमंत्री स्वनिधी योजना ही रस्त्यावरच्या विक्रेत्यांसाठी महत्त्वाचं साधन बनल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज दिल्लीत प्रधानमंत्री स्वनिधी योजनेच्या लाभार्थ्यांना संबोधित केलं. या योजनेअंतर्गत त्यांनी आज १ लाख रस्त्यावरच्या विक्रेत्यांना कर्जाचं वाटप केलं. कोरोना काळात लोकांनी रस्त्यावरच्या विक्रेत्यांची ताकद पाहिली असल्याचं त्यांनी म्हटलं. रस्त्यावरचे विक्रेते आणि रस्त्यालगतच्या दुकानदारांनी समाजासाठी दिलेल्या योगदानाबद्दल प्रधानमंत्र्यांनी त्यांच अभिनंदन केलं.

**<><><><><>**

नागपूरमध्ये देशाची लॉजिस्टिक राजधानी होण्याची क्षमता असल्याचं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. वर्धा जिल्ह्यात सिंदी रेल्वे इथलं ड्रायपोर्ट आणि मल्टी मोडल लॉजिस्टिक पार्क इथल्या रेल्वे टर्मिनल सेवेचं उद्घाटन गडकरी यांच्या हस्ते आज झालं. त्यावेळी ते बोलत होते. सिंदी रेल्वे इथल्या ड्राय पोर्ट वरून विदर्भातला कापूस, कापड, संत्री यासारख्या उत्पादनाची निर्यात करता येईल. विदर्भातल्या शेतकऱ्याला याचा फायदा होईल, असं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचं आणि पोलीस वसाहतीच्या नवीन इमारतीचं भूमिपूजन झालं. पोलिसांची निवासस्थानं चांगली असावीत, यासाठी नवीन वसाहती उभारल्या जात असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

सांगली तालुक्यातल्या शिराळा इथल्या स्मृतीस्थळ विकास आराखड्यास राज्य शासनाच्या शिखर समितीची मान्यता मिळाली असून उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांच्या नियोजन विभागानं त्यासाठी १३ कोटी ४६ लाख रुपयांचा निधी मंजूर केला असून त्यासंबंधीचा शासननिर्णय नियोजन विभागान जारी केला आहे.

**<><><><><>**

अजित पवार यांच्या पक्षानं शरद पवार यांचं नाव आणि फोटो वापरु नये असे आदेश आज सर्वोच्च न्यायालयानं दिले. या बाबत दोन दिवसांत हमीपत्र लिहून देण्याचेही आदेश दिले आहेत. तसंच घड्याळ चिन्हाऐवजी दुसरं चिन्ह वापरण्याच्या पर्यायावर विचार करण्याचा सल्लाही न्यायालयानं आज दिला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या चिन्ह आणि नावाबद्दल निवडणूक आयोगानं दिलेल्या निर्णयला शरद पवार यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. या प्रकरणाच्या सुनावणीत आज सर्वोच्च न्यायालयानं हे आदेश दिले आहेत. न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती के.व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली.

सर्वोच्च न्यायालयात युक्तीवाद करतांना अभिषेक मनु सिंघवी यांनी अजित पवार यांच्या पक्षानं शरद पवार यांचा फोटो वापरलेले पोस्टर्स न्यायालयाला दाखवले. ग्रामीण मतदारांना आकर्षित करण्यासाठी पोस्टरमध्ये 'घड्याळ' चिन्ह आणि शरद पवारांची चित्रे वापरण्याची परवानगी देऊ नये अशी मागणी त्यांनी यावेळी केली. तुमच्या पक्षाला आता निवडणूक आयोगाकडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अशी ओळख मिळाली असताना तुम्ही शरद पवार यांचा फोटो का वापरता? असा प्रश्नही न्यायालयानं उपस्थित केला.

**<><><><><>**

देशातील बड्या उद्योगपतींचे १६ लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ केले जाते मग, या देशातील शेतकऱ्यांचे कर्ज माफ का होऊ शकत नाही. केंद्रात इंडिया आघाडीची सत्ता आल्यानंतर शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यात येईल, असं आश्वासन काँग्रेस पक्षाचे नेते खासदार राहुल गांधी यांनी आज नाशिक मध्ये दिले. राहुल गांधी यांच्या

भारत जोडो न्याय यात्रेनिमित्त आज जिल्ह्यातील चांदवड येथे आयोजित सभेत ते बोलत होते.

देशात महागाई, बेरोजगारी, भागीदारी, धर्म आणि शेतकरी अशा अनेकांच्या समस्या आहोत. शेतकरी समस्याग्रस्त असून त्यांच्या समस्यांवर मात करण्यासाठी शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात येईल, देशात जीएसटीच्या माध्यमातून शेतकऱ्यांवर प्रथमच लागू करण्यात आलेला कर मागे घेण्यात येईल. असंही त्यांनी सांगितलं.

स्वामीनाथन आयोगांच्या शिफारसीनुसार किमान आधारभूत किंमत देण्यात येईल, निर्यातबंदी आणि अन्य समस्यांमुळे शेतकऱ्यांना आत्महत्या कराव्या लागत आहेत, अशी टीका राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांनी केली तर केंद्रशासनाने कांदा निर्यात बंदी करून शेतकऱ्यांना देशोधडीला लावले आहे, अशी टीका खासदार संजय राऊत यांनी केली. दरम्यान, राहुल गांधी यांनी पिंपळगाव बसवंत, ओझर आणि नाशिक येथे रोड शो केला. त्यानंतर त्र्यंबकेश्वर येथे जाऊन दर्शन देखील घेतले.

**<><><><><>**

एक राष्ट्र एक निवडणूक संदर्भात माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीनं आज नवी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना अहवाल सादर केला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते. समितीनं सादर केलेला अहवाल १८ हजार ६२६ पानांचा आहे. या अहवालात सर्व संबंधित पक्ष आणि तज्ज्ञांशी झालेल्या विस्तृत चर्चा आणि १९१ दिवसांच्या संशोधनाच्या निष्कर्षांचा समावेश असल्याची माहिती कायदा आणि न्याय मंत्रालयानं दिली आहे.

**<><><><><>**

इसिस या दहशतवादी संघटनेशी संबंधित शस्त्रसाठा आणि स्फोटकं पुण्यात पकडल्याप्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणेनं काल आणखी ४ जणांविरोधात आरोपपत्र दाखल केलं असून एका आरोपीविरुद्ध पुरवणी आरोपपत्र दाखल केलं आहेत. या प्रकरणी एन आय ए ने आतापर्यंत ११ जणांविरोधात आरोपपत्र दाखल केलं आहे. महाराष्ट्र आणि गुजरातमधे विविध ठिकाणी स्फोट घडवून दहशत पसरवण्याचा कट गेल्या वर्षी जुलैमधे राष्ट्रीय तपास यंत्रणेने उघडकीस आणला होता. त्यावेळी शस्त्रास्त्र आणि स्फोटकांच्या मोठ्या साठ्यासह दहशतवादी विचार पसरवणारं साहित्यही जप्त करण्यात आलं होतं. संबंधित आरोपींना नंतर पुण्याच्या विविध भागातून पकडलं होतं.

**<><><><><>**

परभणी जिल्ह्यातल्या मानवत तालुक्यातल्या पाळोदी गावात हर घर जल योजनेमुळं घराघरात दररोज नळाचं पाणी उपलब्ध झालंय. उन्हाळ्यात टँकरची वाट पहावी लागणाऱ्या ग्रामस्थांना आता घरपोच पाणी मिळतं आहे. याविषयी गावातल्या रहिवाशी अरुणा सोळंके म्हणाल्या.

**होल्ड - अरुणा सोळंके**

**<><><><><>**

पुणे, पिंपरी चिंचवड आणि बारामतीमध्ये शहरांतर्गत वाहतूक करण्यासाठी परवानगी नाकारल्यानंतरही, बेकायदा वाहतूक सुरु ठेवणाऱ्या ओला आणि उबर या खासगी कंपन्यांविरुद्ध कारवाईसाठी पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयानं ४ स्वतंत्र पथकं

तैनात केली आहेत. बंदीच्या निर्णयाविरोधात अपील करण्यासाठी दोन्ही कंपन्यांना ३० दिवसांची मुदत देण्यात आली असली तरी या काळात त्यांना शहरांतर्गत वाहतूक मात्र करता येणार नाही.

<><><><><>

जागतिक बाजारातल्या मजबूत स्थितीच्या पार्श्वभूमीवर देशाच्या शेअर बाजारात आज तेजीचा जोर राहिला. सर्व क्षेत्रांच्या समभागांची आज मोठ्या प्रमाणात खरेदी झाली. सेन्सेक्स आज ३३५ अंकांनी वधारला आणि ७३ हजार ९७ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी १४९ अंकांनी वधारला आणि २२ हजार १४७ अंकांवर बंद झाला. गेल्या काही दिवसात घसरलेले मध्यम आणि छोट्या कंपन्यांचे समभाग आज मोठ्या प्रमाणात वधारले.

<><><><><>

सिंधुदुर्ग हा पर्यटन जिल्हा असून महामार्ग सुशोभीकरणाच्या माध्यमातून कोकणातल्या संस्कृतीचा  ठसा उमटणार असल्याचा विश्वास केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी व्यक्त केला.  आज त्यांच्या हस्ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातून जाणाऱ्या मुंबई गोवा महामार्गाच्या सुशोभीकरणाच्या कामाचा शुभारंभ झाला. सिंधुदुर्ग जिल्ह्यात तळगाव ते पत्रादेवी या सुमारे ११० किलोमीटर मार्गाच्या सुशोभीकरणासाठी ९ कोटी ३० लाख रूपयांचा निधी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी मंजूर केल्याचं राणे यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

जालना शहरात आज स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी अभियानांतर्गत छत्रपती संभाजी उद्यानात उभारण्यात आलेल्या दीडशे फूट उंचीच्या राष्ट्रीय ध्वजाचं लोकार्पण केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या हस्ते झालं. यावेळी जालना शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या घाणेवाडी जलाशयासह जायकवाडी पाणीपुरवठा योजनेच्या ७२ कोटी रुपयांच्या सुधारणात्मक कार्यक्रमांचा शुभारंभ झाला.

**<><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई संघानं ४२ वा विजय नोंदवला असून अंतिम सामन्यात मुंबईच्या संघानं विदर्भ संघाचा १६९ धावांनी पराभव केला. विजयासाठीचं ५३८ धावांचं आव्हान घेऊन मैदानात उतरलेला विदर्भाचा संघ ३६८ धावात गारद झाला.

या सामन्यात विदर्भ संघानं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण स्विकारलं. मुंबईनं आपल्या पहिल्या डावात २२४ धावा केल्या. त्याला प्रत्युत्तर देतांना विदर्भाचा पहिला डाव केवळ १०५ धावांमध्ये संपुष्टात आला होता. मुंबईनं आपल्या दुसऱ्या डावात ४१८ धावा करत विदर्भ संघापुढं विजयासाठी ५३८ धावाचं आव्हानं दिलं. त्याचा पाठलाग करतांना विदर्भाला केवळ ३६८ धावाचं करता आल्या. मुंबईच्या दुसऱ्या डावात शानदार शतक झळकावणारा मुशीर खान सामनावीर ठरला असून संपूर्ण उत्तम कामगिरी करणारा तनुष कोटियन मालिकावीर ठरला आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून सोसाट्याचा वारा वाहील आणि गारांचा पाऊस पडेल. तर राज्याच्या उर्वरित भागात हवामान कोरडं राहील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.